## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६४४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १६/०९/२०१७

**१) भांडण व शिवीगाळ करुन महिलेचा विनयभंग करुन काठीने मारुन जखमी करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १४/०९/२०१७ चे १८.३० वा दर. यातील फिर्यादी याची पत्नी ही घरी हजर असतांना यातील आरोपी क्र. १ ने विनयभंग करण्याचे उद्येशाने घरात प्रवेश करुन फिर्यादीचे पत्नीने फिर्यादीस घडलेली हकीकत सांगितलेवर फिर्यादीने आरोपी क्र. १ ला हटकले असता आरोपी क्र. ०१ व ०२ यांनी विनाकारण आरोप करीत आहेत असे बोलुन फिर्यादी सोबत भांडण करुन दोन्ही आरोपीतांनी मिळुन फिर्यादीस काठीने डोक्यावर, उजव्या पायावर, टोंगळयाला, उजवे हाताचे भुजेवर व पाठीवर मारुन जखमी केले व शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ४५२,३५४,५०४,५०६,३२४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. सोलंकी पो.स्टे आंधळगाव हे करीत आहेत.

**२) रेंगजीनच्या बॅगमधील मंगळसुत्राची चोरी . :–**

दिनांक १४/०९/२०१७ चे १५.४५ ते १६.०० वा दर. यातील फिर्यादी सौ. मंगला पुंडलीक ठेंगरी वय ३२ वर्ष, रा. रुईनिलज ही एसटी बस क्र. एमएच ४० एन ९३७५ ने भंडारा ते स्वगावी जात असतांना गळयातील सोन्याचे मंगळसुत्र १० ग्रॅम, किंमती २०,०००/–रु. चे हे अचानक तुटले त्यास रुमालात बांधुन रेगजीनच्या बॅग मध्ये ठेवले असता कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे अप क्र. ००/१७ कलम ३८० भांदविचे कागदपत्र पो. स्टे. ला प्राप्त झाल्याने कलम ३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलच्या धडकेत महिला जखमी . :–**

दिनांक ०७/०९/२०१७ चे १६.०० वा दर. यातील फिर्यादी उत्तम रामचंद्र मेश्राम वय ४३ वर्ष, रा. खेडपार हा त्याचे मोटार सायकल क्र. एम एच ३६ टी ०८०७ वर आई शांताबाई रामचंद्र मेश्राम वय ६२ वर्ष, हिस डब्बल सिट बसवुन आलेसुर यथुन खेडेपार येथे जात असता यातील आरोपीने त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला धडक देवुन फिर्यादीचे आईला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३८ भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. फुलबांधे पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

**४) जुण्या वादाचे कारणावरुन लाकडी ऊभारीने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १५/०९/२०१७ चे १८.३० वा दर. यातील फिर्यादी दुर्गेश हेमराज टिचकुले वय २५ वर्ष, रा. मोठी पेंढरी हा गावाचे चौकात मोटार सायकल जवळ उभा राहुन मित्रा सोबत बोलत असतांना यातील आरोपीने जुण्या वादाचे कारणा वरुन हातात ऊभारी घेवुन फिर्यादीचे मागेहुन येवुन डोक्यावर लाकडी ऊभारी मारुन जखमी केल्याने फिर्यादींचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

५) **अवैध दारू/जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक १५/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, कारधा, वरठी, अडयाळ व लाखांदुर येथे अवैध दारू/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून ३९ लिटर हा.भ. दारू किंमती ३७००/–रु., ४३ लिटर २०० मिली लिटर देशी + १ मारुती ओमनी किंमती २,१५,०००/–रु. तसेच जुगारातुन किंमती ३४५/–रु. असा एकुण किंमती २,१९,०४५/–रु. माल जप्त करण्यात आला आहे.

**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र.८८०५६५७२६२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.